लोकसत्ता पु.पा.१.

# नव्या रेल्वे मार्गिकेत पाच इमारती बाधित

## विरार-बोरिवली रेल्वे स्थानकादरम्यानचे सर्वेक्षण पूर्ण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरार आणि बोरिवील रेल्वे स्थानकादरम्यान टाकण्यात येणाऱ्या नवीन मार्गिकेसाठी करण्यात आलेल्या नवीन सर्वेक्षणाने नागरिकांना दिलासा दिला आहे. वसई रोड स्थानकालगतच्या केवळ पाच इमारती बाधित होणार आहेत तर नायगावच्या उमेळामधील एकही खासगी घर बाधित होणार नाही. बाधित इमारतीमधील रहिवाशांना बाजारभावापेक्षा जास्त रकमेचा मोबदला मिळणार आहे.

पश्चिम रेल्वेवरील विरार-बोरिवलीदरम्यान नव्याने ५ आणि ५ क्रमांची मार्गिका टाकली जाणार असून ३० ट्रॅकचे यार्ड तयार केले जाणार आहे. यासाठी नायगाव आणि वसई रोड रेल्वे स्थानकालगतच्या इमारती बाधित होणार आहे. पहिले सर्वेक्षण केल्यानंतर त्याच अनेक चुका होत्या. त्यामुळे नागरिक धास्तावले होते. यामुळे वसई पश्चिमेकडील उमेळे, उमेळमान, दिवाणमान, माणिकपूर आणि नवघर या गावातील घरे बाधित होणार होती. या विरोधात मोठा जनक्षोभ उसळला होता. त्यामुळे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी नव्याने सर्वेक्षणाची मागणी केली होती. त्यानुसार नव्याने करण्यात आलेले सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

### नायगावमधील रहिवाशांना दिलासा

नायगाव पश्चिमेच्या उमेळे येथील भूमापन क्रमांक २१ मधील घरे बाधित होणार असल्याचे जुन्या सर्वेक्षणात सांगण्यात आले होते. मात्र नव्याने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात उमेळे येथील खासगी जागा जाणार नाही. ज्या जागा बाधित होणार आहे ते मिठागराचे क्षेत्र असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### 'पाच वर्षांत काम पूर्ण करणार'

रेल्वे यार्डासाठी या मार्गिका टाकण्यात येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प ५ वर्षांचा आहे. त्यातील १ वर्ष पूर्ण झाले आहे. आता नागरिकांची काहीच अडचण नाही. लवकरच भूसंपादन प्रक्रिया पार पाडली जाईल आणि पुढील कामाला सुरुवात होईल, अशी माहिती पश्चिम रेल्वेचे सहाय्यक अभियंता भारद्वाज यांनी सांगितले

**वसईतील केवळ ५ इमारती होणार बाधीत**

रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार वसई रोड रेल्वे स्थानकालगत असलेल्या आनंदनगर परिसरातील केवळ ५ इमारती बाधित होणार आहेत. त्यात श्रीराम कॉम्प्लेक्स, शिवशक्ती अपार्टमेट, सहयोग अपार्टमेंट, आदर्श आणि जगदीश कृपा आदी ५ इमारतींचा समावेश आहे. याशिवाय चंपा सदन इमारतीचा काही भाग जाणार आहे. पाच इमारतींचे कुंपण आणि प्रवेशद्वार बाधित होणार होते. त्यामुळे इमारतींमधील रहिवाशांच्या मागणीनुसार पाचही **(पान ३ वर)**

## भंगाराच्या साहित्याला आग



**भाईंदर :** मिरा रोड येथे फटाक्यांमुळे मोकळ्या जागेवरील भंगाराच्या साहित्याला आग लागल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. मिरा रोड येथील मंगल नगर परिसरात असलेल्या मोकळा जागेत काही झोपड्या आणि भंगारचे साहित्य होते. दरम्यान सोमवारी रात्री याठिकाणी फटका फुटल्यामुळे आग पेटली. यात काही क्षणातच हे भंगारचे साहित्य जळून खाक झाले.तर ही आग झोपड्याजवळ येण्यापूर्वीच अग्निशमन पथकाने घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवल्याची माहिती अग्निशमन अधिकाऱ्याने दिली आहे.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पु.पा.४.

# मिरा-भाईंदरमध्ये रंगणार तिरंगी लढत?

## भाजपच्या मेहतांविरोधात गीता जैन तर दोघांविरोधात मविआचे मुझफ्फर हुसैन

**भाईंदर : राजू काळे**

१४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघात भाजपने अधिकृत उमेदवार म्हणून नरेंद्र मेहता यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्यानंतर भाजपमधूनच निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या अपक्ष आ. गिता जैन यांनी यंदाही अपक्ष म्हणून निवणूक लढण्याची घोषणा केली आहे. यावरून जैन विरुद्ध मेहता असा सामना रंगणार असला तरी या दोघांविरोधात महाविकास आघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसैन यांनी दंड थोपटले आहेत. तर यंदा मतदारांमध्ये असलेल्या नाराजीवरून यंदाची निवडणूक तिरंगी होणार असल्याचे बोलले जात असले तरी खरी लढत मेहता विरुद्ध मुझफ्फर यांच्यातच होण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे.

२०१९ मधील विधानसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार गिता जैन यांनी भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांचा १५ हजार ५२६ मतांनी पराभव केला होता. त्यावेळी मेहता यांना ६४ हजार ४९ मते मिळाली होती तर जैन यांना ७९ हजार ५७५ मते मिळाली होती. मुझफ्फर यांना ५५ हजार ९३९ मते मिळाल्याने त्यांचे डिपॉझिट शाबूत राहून त्यांना पहिल्यांदा मिळालेल्या मतांचा आकडा आश्चर्यकारक ठरला होता. यामुळे मविआने यंदाच्या निवडणुकीत पुन्हा त्यांना उमेदवारी दिली आहे. दरम्यान महायुतीकडून उमेदवारच जाहीर होण्याच्या प्रतिक्षेत मतदार असताना शेवटच्या



गीता जैन



मुझफ्फर हुसैन



नरेंद्र मेहता

क्षणाला पक्षाने मेहता यांना उमेदवारी दिली. यामुळे संतापलेल्या गिता यांनी थेट भाजपवरच निशाणा साधून मेहतांना दिलेली उमेदवारी चुकीची असल्याचा आरोप केला आहे. तर त्यांच्या समर्थकांनी पक्षाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात असले तरी अनेकजण पक्षातच राहणार असल्याची चर्चा देखील सुरु झाली आहे. जैन यांनी भाजपवर साधलेला निशाणा शहरातील भाजप तसेच मोदी समर्थक मतदार नाराज होण्याची शक्यता बळावली आहे. यामुळे ते मतदानावेळी मेहता अथवा मुझफ्फर यांच्या बाजूने निर्णायक मतदान करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यावरून या मतदार संघातील निवडणूक तिरंगी ऐवजी दुरंगीच होणार असल्याची अटकळ देखील केली जात आहे.

गतवेळच्या निवडणुकीत मेहता विरुद्ध जैन द्वंद्वात जैन यांनी बाजी मारून मेहतांच्या विजयाची स्वप्न धुळीला मिळविले होते. यंदाच्या निवडणुकीत पुन्हा मेहता विरुद्ध जैन सामना रंगणार असून गतवेळप्रमाणेच मेहता भाजपमधून तर जैन या अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार आहेत. जैन यांनी यंदाची निवडणूक सुद्धा जिंकण्याचा मानस व्यक्त केला असला तरी गेल्या ५ वर्षांमध्ये जैन यांनी केलेल्या कार्यावर शहरातील मतदार प्रचंड नाराज असल्याचे बोलले जात आहे. या नाराजांची मते मेहता व मुझफ्फर यांच्या बाजूने जाण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. मेहता यांनी यंदाच्या निवडणुकीत जायंट किलर ठरून आपल्याला जास्तीजास्त मते कशी मिळतील, त्याचे डावपेच आखल्याचे बोलले जात आहे. तर गतवेळपेक्षा यंदाच्या निवडणुकीत मुझफ्फर यांनी डोअर टू डोअर प्रचाराला प्राधान्य दिले आहे.

शहरातील एका धार्मिक वादाच्या पार्श्वभूमीवर जैन यांनी आंध्रप्रदेशचे आ. टी. राजायांना आमंत्रित करून हिंदू कार्ड खेळण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या या हिंदू कार्डमुळे शहरातील मुस्लिम समाज जैन यांच्यावर प्रचंड नाराज झाला. त्याचा वचपा त्यांनी गेल्या लोकसभा निवडणुकीत मविआचे उमेदवार राजन विचारे यांना एकगठ्ठा मते देऊन काढला. या निवडणुकीत मिरा-भाईंदर मधून विचारे यांना चांगली मते मिळाली होती. त्याची पुनरावृत्ती यंदाच्या विधानसभा निवडणुकीत होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मविआचे उमेदवार मुझफ्फर यांच्या मतांचे पारडे जड होण्याचे संकेत मिळत असले तरी मेहता विरुद्ध जैन सामन्यात देखील दोघांना किती मतदारांचा कौल मिळेल, हे पाहणे सुद्धा औत्सुक्याचे ठरणार आहे.

सामना पा.नं.३.

'खा-की'ला चाप; पोलिसांच्या कामाचे नियमित मूल्यमापन करा

# भ्रष्ट पोलीस अधिकाऱ्यांची होणार गच्छंती!

## जनतेचा विश्वास ढळू देऊ नका ■ हायकोर्टाचे वरिष्ठ प्रशासनाला आदेश

मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी) - खाकी वर्दीतील भ्रष्टाचाराच्या साखळीला चाप बसणार आहे. बेकायदेशीर अटकेची कारवाई करण्याचे वाढते प्रमाण उच्च न्यायालयाने गांभीर्याने विचारात घेतले आहे. याच अनुषंगाने ऑगस्ट २०१३च्या आदेशाला अनुसरून पोलिसांच्या कामाचे ठरावीक काळाने मूल्यमापन करा, कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांची पोलीस दलातून हकालपट्टी करा, असे आदेश न्यायमूर्ती भारती डांगरे व न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने वरिष्ठ प्रशासनाला दिले आहेत.

सायन-कोळीवाडा येथील रत्ना वन्नाम



व चंद्रकांत वन्नाम या दांपत्याने वडाळा टीटी पोलिसांच्या कारवाईविरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागितली होती. वन्नाम दांपत्यातर्फे ॲड. सुविधा पाटील यांनी पोलिसांच्या मनमानीकडे लक्ष वेधले. अनधिकृत बांधकामाबाबत शेजाऱ्याने तक्रार केल्यानंतर पोलिसांनी पालिकेच्या अधिकार क्षेत्रात घुसखोरी करीत चंद्रकांत वन्नाम यांना अटक केली. या बेकायदा अटकेविरोधातील याचिकेवर अंतिम निर्णय देताना न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने मुंबई पोलिसांना मोठा झटका दिला. चंद्रकांत वन्नाम यांना केलेली अटक बेकायदेशीर होती. पोलीस अधिकारांचा गैरवापर करीत असल्याचे हे उत्तम उदाहरण आहे, असे मत नोंदवत खंडपीठाने चंद्रकांत यांची पत्नी रत्ना यांना आठ आठवड्यांत १ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश सरकारला दिले. भरपाईची रक्कम सरकारबरोबरच बेकायदा अटकेला जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याचे खंडपीठाने म्हटले आहे.

### अधिकारांचा गैरवापर सरकारला भोवला

पोलिसांनी अधिकारांचा केलेला गैरवापर राज्य सरकारला चांगलाच भोवला आहे. बेकायदा अटकेमुळे याचिकाकर्त्या रत्ना वन्नाम यांना मनस्ताप झाला, असा ठपका ठेवत न्यायालयाने सरकारला १ लाख रुपयांचा दंड ठोठावला आणि ही रक्कम भरपाई म्हणून रत्ना वन्नाम यांना देण्याचे आदेश दिले. या प्रकरणात वेळोवेळी निर्देश देऊनही जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केलेली नाही, अशी नाराजी व्यक्त करीत न्यायालयाने सरकारला १४ ऑगस्ट २०१३ च्या आदेशाचे पालन करण्याचे बजावले आहे. पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत असेल तर दहा वर्षांपूर्वीच्या आदेशांचे पालन करा, असा खोचक टोला न्यायालयाने लगावला आहे.

### सरकारला या आदेशांचे पालन करावे लागणार

■ पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या कामाचे ठरावीक काळाने मूल्यमापन करावे. यादरम्यान कर्तव्यात कसूर करणारे तसेच भ्रष्ट अधिकारी सापडतील त्यांना पोलीस दलातून बाहेर काढावे.

■ कर्तव्यात कसूर, सेवा नियमावलीचे उल्लंघन, गैरवर्तन आदी गैरकृत्य करणाऱ्या पोलीस कर्मचारी-अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी तातडीने पावले उचला.

■ ज्या पोलिसांनी गुन्हेगारी कृत्य केल्याचे उघड होईल, त्यांच्याविरुद्ध फौजदारी कायद्यातील तरतुदींना धरून कारवाई करावी.

■ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही त्यांच्या अधिकाराचा योग्य वापर करावा, जनतेचा विश्वास ढळू देऊ नये.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु.पा.५

# बेकायदा आरएमसी प्लांटमुळे शेती संकटात

**वसई :** बेकायदा सुरू असलेल्या रेडी मिक्स काँक्रीट प्लांटमुळे वसईतील शेती आणि पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मालजीपाडा, ससूनवघर, ससुपाडा, जुचंद्र, वालीव, आडणे-भिनार, नवजीवन येथे मोठ्या प्रमाणात बेकायदा आरएमसी प्लांट सुरू आहेत. या प्लांटमुळे आसपासच्या परिसरात धुळीचे साम्राज्य पसरत आहे. धुळीने येथील झाडांची पाने व्यापून ती नष्ट झाली आहेत. येथील भातशेतीही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या प्लांटमध्ये सुरुंग स्फोट घडवून येत असल्यामुळे ग्रामस्थांच्या घराला तडे गेले आहेत. तसेच प्लांटसाठी डोंगरही पोखरले जात आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या सखल भागात पावसाचे पाणी साचून त्यात उतरलेल्या लोकांचे बुडून बळीही गेले आहेत. त्याचप्रमाणे परिसरातील जमिनीचा पोत खराब होत चालला असून पाण्याचे स्रोतही दूषित होत आहेत. रासायनिक पदार्थ आणि धुळीमुळे शेतकऱ्यांना ग्रामस्थांना श्वसनाचे विकारही होऊ लागले आहेत. यामुळे या सर्व प्रकाराची तहसीलदार, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांमार्फत बजावलेल्या नोटिशीपर्यंत कारवाई येऊन थांबत आहे.

# ऐवज परत मिळाल्याने नागरिकांची 'दिवाळी'

**वसई :** चोरीस गेलेला ३९ लाख १५ हजार २८२ रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांकडून हस्तगत करून तो दिवाळीच्या मुहूर्तावर नागरिकांना परत करण्याची कामगिरी नालासोपारा पोलिसांनी केली आहे. घरफोडी, चोरी आणि फसवणुकीचे सहा गुन्हे नालासोपारा पोलीस ठाण्यात दाखल होते. गुन्ह्यात दुचाकी, मोबाइल आणि दागिने चोरण्यात आले होते. या गुन्ह्यांची उकल करून नालासोपारा पोलिसांनी त्यातील रोख ५ लाख, ५ हजार ४०८ रुपये, एक लाख रुपये किमतीच्या दुचाकी, मोबाईल आणि २८ लाख २३ हजार ५४० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असा एकूण ३९ लाख १५ हजार २८२ रुपये किमतीचा मुद्देमाल नागरिकांना परत केला आहे. त्यामुळे ऐन दिवाळीच्या शुभमुहूर्तावर सामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे.

सामना पा.नं. ८.

# मोटर वाहन कायद्याला हायकोर्टात आव्हान

## केंद्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश



**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी)** – २०१९ मधील सुधारित मोटर वाहन कायद्याला आव्हान देणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल झाली आहे. सुधारित कायद्यात केलेले बदल हे रस्ते अपघातातील पीडित व त्यांच्या कुटुंबीयांच्या हिताला धक्का देणारे आहेत. त्यामुळे हा कायदा असंवैधानिक घोषित करून रद्द करावा, अशी मागणी याचिकेत केली आहे. न्यायालयाने याचिकेची गंभीर दखल घेत केंद्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले.

मोटर अपघात दावे न्यायाधिकरणात प्रॅक्टिस करणाऱ्या वकिलांच्या संघटनेने ही जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेवर बुधवारी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्या वकिलांनी सुधारित मोटर वाहन कायद्यातील विविध बदलांवर आक्षेप घेतला. नवीन कायद्यात रस्ते अपघात झाल्यानंतर भरपाईचा दावा करण्यासाठी सहा महिन्यांची मर्यादा आखून देण्यात आली आहे. सरकारने ही कालमर्यादा आखून गरीबांना भरपाईचा दावा करण्याची संधी नाकारली आहे. तसेच भरपाईचा दावा करण्यात होणाऱ्या विलंबासंबंधी नवीन कायद्यात कुठलीही तरतूद नाही, याकडे खंडपीठाचे लक्ष वेधण्यात आले. त्याची गंभीर दखल घेत खंडपीठाने केंद्र सरकारला याचिकेवर प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी डिसेंबर महिन्यात पुढील सुनावणी होणार आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.५.७

पैसे मागितल्यानंतर वापरलेल्या वस्तू परत

# पोलिसांनी एसी, कॉम्प्युटर, टीव्ही फुकट घेतले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ठाण्यातील एका पोलिस ठाण्यात टीव्ही., एसी, वॉटर कुलर, प्रिंटर, कॉम्प्युटर यांसारखी महागडी इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरली गेली आणि पुरवठादाराने पैशांची मागणी केली असता पोलिसांनी त्याला कोणताही मोबदला न देता वापरलेल्या वस्तू परत केल्या होत्या. पोलिसांच्या या कारभारावर न्यायालयाने नाराजी व्यक्त करत पोलिस महासंचालकांना या प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

ठाण्यातील कासारवडवली पोलिस ठाण्यात व्यावसायिक नैनेश पांचाळ याच्याविरोधात धनादेश न वटल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी न्या. सारंग कोतवाल व न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर झाली. पांचाळने इलेक्ट्रॉनिक दुकानातून एसी, वॉटर कुलर, प्रिंटर, टीव्ही. इत्यादी महागड्या वस्तू विकत घेतल्या आणि पैसे दिले नाहीत, तसेच त्याने दिलेला चेकही बाऊन्स झाला, असे तक्रारदाराने म्हटले होते.

पांचाळ यांनी सर्व वस्तू पोलिस ठाण्याला पुरविल्याचे सांगत पुरवठादाराला ३.७५ लाख रुपये देण्याचे मान्य केले. तेव्हा न्यायालयाने त्यांच्यावरील गुन्हा रद्द केला.

## गंभीर कारवाई आवश्यक : न्यायालय

- 'तक्रारीतील आरोप खरे असतील, तर गंभीर कारवाई आवश्यक आहे. एका पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी योग्य प्रक्रिया पार न पाडता खासगी पक्षाकडून इतकी महागडी उपकरणे घेऊ कसे शकतात?
- न्यायालयाने पोलिस महासंचालकांना पोलिस उपायुक्त (सीआयडी) दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून अहवाल देण्याचे निर्देशही दिले.

## सुप्रीम कोर्टानेही सुनावले

मालमत्तेच्या चाव्या घेऊन स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याच्या पोलिसांच्या कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच टीका केली आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याची पोलिसांची कारवाई संपूर्ण अराजकता दर्शवते. कोणत्याही परिस्थितीत, पोलिसांना स्थावर मालमत्तेच्या ताब्यात हस्तक्षेप करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. कारण अशा कृतीला कायद्याच्या कोणत्याही तरतुदीद्वारे मंजुरी मान्यता नाही.

**- न्यायमूर्ती सी. टी. रविकुमार आणि न्यायमूर्ती संदीप मेहता**

लोकमत ५.५.४.

ऐन दिवाळीत बदली झाल्याने नाराजी

# निवडणूक काळात ३८ निरीक्षकांच्या बदल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाने तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच जागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबतच्या दिलेल्या आदेशानंतर उशिराने पण ऐन निवडणूक काळात मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयातील ३८ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या बुधवारी करण्यात आल्या आहेत. १९ पोलिस ठाण्यांपैकी १५ पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. ऐन दिवाळीत बदली आदेश काढल्याने बदलीबाबत नाराजी व्यक्त होत आहे. काहींनी मॅटमध्ये धाव घेण्याची तयारी चालविली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ३१ जुलै २०२४ रोजी बदल्यांबद्दल आदेश जारी केले होते. त्यामध्ये एकापेक्षा जास्त जिल्ह्याचे क्षेत्र पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत असले तरी तीन वर्षे सेवा झालेल्या अधिकाऱ्यांची त्या आयुक्तालयाच्या बाहेर बदली करण्याचे नमूद आहे.

२८ सप्टेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाने अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांत बदल्या करून तसे प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र निवडणूक प्रक्रिया १५ ऑक्टोबरपासून सुरू झाल्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाने बदलीस पात्र पोलिस अधिकाऱ्यांची यादी पोलिस महासंचालकांना दिली होती. पोलिस महानिरीक्षक के.एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी ३० ऑक्टोबर रोजी २६३ पोलिस निरीक्षकांच्या बदलीचा आदेश जारी केला आहे.



- आयुक्तालयातील १९ पोलिस ठाण्यातील १५ पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या बदल्या झाल्या आहेत. नवघर, उत्तन, अर्नाळा व बोळींज या चार पोलिस ठाण्यांतील वरिष्ठ निरीक्षक यांच्या बदल्या ते बदलीस पात्र नसल्याने झालेल्या नाहीत.

## कुणाची झाली बदली?

बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे, नयानगरचे विलास सुपे, मीरा रोडचे चंद्रकांत सरोदे, पेल्हारचे जितेंद्र वनकोटी, मांडवीचे संजय हजारे, माणिकपूरचे राजू माने, विरारचे विजय पवार, नायगावचे रमेश भामे, काशिगावचे राहुलकुमार पाटील, भाईंदरचे प्रफुल्ल वाघ, वसईचे रणजित आंधळे, तुळींजचे शैलेंद्र नगरकर, वालीवचे जयराज रणावरे, अचोळेचे बाळासाहेब पवार, नालासोपाराचे सदाशिव निकम या पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी यांचा समावेश आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.५०.२

# नायगावच्या पूर्वेला तिवरांची कत्तल सुरु

## आचारसंहिता लागताच भूमाफिया सक्रिय

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागताच भूमाफिया सक्रिय झाले आहेत. शासकीय यंत्रणा निवडणुकीच्या कामकाजात व्यस्त झाल्यामुळे विविध ठिकाणी शासकीय आणि खासगी जमिनीवर तिवरांची झाडे नष्ट करून त्यावर कब्जा करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत.

नायगाव पूर्वेस डॉन हायस्कूलच्या मागील बाजूस तिवरांचे जंगल भुईसपाट करून त्यावर इमारती बांधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याबाबत सामाजिक संस्थांनी अनेकदा तक्रारी करूनही शासकीय यंत्रणा आणि वन विभाग या गैरप्रकारांवर नियंत्रण आणण्यास अपयशी ठरत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

तिवरांची झाडे नष्ट करणे हा कायदेशीर गुन्हा असून, उच्च न्यायालयाने यावर कडक निर्बंध आणलेले आहेत. तरीही शासकीय यंत्रणा याबाबत गंभीर नाही. सर्वसाधारण २० वर्षांपूर्वी या संपूर्ण परिसरामध्ये तिवरांच्या झाडांचे जंगल अस्तित्वात होते.



नायगाव पूर्वेस डॉन हायस्कूलच्या मागील बाजूस तिवरांचे जंगल भुईसपाट करून त्यावर इमारती बांधण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

### विधानसभा निवडणुकीनंतर होणार कारवाई

मागील काही वर्षांत राजकीय आशीर्वाद असलेले भूमाफिया सक्रिय झाल्यामुळे ही कांदळवने नष्ट झाली आहेत. त्यामुळे भविष्यात या भागाला नैसर्गिक हानीचा मोठा फटका बसणार आहे. वसई-विरार हे शहर झपाट्याने वाढणारे शहर म्हणून ओळखले जाते. यामुळे शहरामध्ये जागेला सोन्याचा भाव आला आहे. त्यामुळे नायगाव वसई पूर्व महामार्गालगत जिथे जागा मिळेल तिथे लोकवस्ती वाढत आहे. २०१० मध्ये या परिसरात कांदळवने नष्ट करून त्यावर चाळी बांधल्या गेल्या; परंतु, स्थानिक प्रशासनाने कुठल्याही स्वरूपाची कारवाई केली नाही. २०१७ मध्ये याबाबत गुन्हे दाखल करण्यात आले. हीच अवस्था बापाणे येथे झाली आहे. या ठिकाणी वसईतील सर्वांत मोठे कांदळवन मातीच्या ढिगाऱ्याखाली गडप करण्यात आले. यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी करून राजरोस उभी राहणारी ही बांधकामे थांबवणार कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीनंतर याविरोधात कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कांदळवन समितीचे अध्यक्ष, वसई उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी दिली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.११.१९.

# निवडणूक काळात पहिला खंडणीचा गुन्हा दाखल

## व्यावसायिकाकडून उकळले साडेतीन लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ऐन निवडणुकीत काळात वसई-विरारमध्ये खंडणीचा पहिला गुन्हा दाखल झाल्यामुळे राजकीय क्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे. एका ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या मालकाकडून साडेतीन लाखांची खंडणी घेतल्याप्रकरणी भाजपचे वसई-विरार जिल्हा उपाध्यक्ष भूषण नाईकविरोधात वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवघर येथील टेम्पोचालक तथा आर्यन टेम्पो सर्व्हिस-ट्रान्स्पोर्ट कंपनीचे मालक बिहारी गुप्ता यांनी वालीव पोलिस ठाण्यात केलेल्या तक्रारीनुसार २८ ऑक्टोबरला सकाळी साडेनऊच्या सुमारास भूषण नाईक आणि त्याचे तीन साथीदार बिहारी यांच्या कार्यालयात आले. त्यावेळी त्यांनी टेम्पोत असलेल्या सामानाचे मोबाइलमध्ये शूटिंग करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांच्याकडे या प्रकाराबाबत विचारणा केल्यावर तुझ्या टेम्पोतील माल अनधिकृत आहे. तुझी गाडी आणि माल जमा करून तुला पोलिसांच्या हवाली करीन, महापालिकेमार्फत तुझा माल जप्त करीन आणि पत्रकारांना माहिती देईन, तुला जेलमध्ये जावे लागेल, तुझा गाळा सील होईल, अशी भीती त्यांनी दाखवली. तसे न करण्यासाठी त्यांनी पाच लाखांची मागणी केली, असे तक्रारीत म्हटले आहे.




### अनेकांना केले ब्लॅकमेल?

१ या प्रकारानंतर भूषण नाईक हा आपल्या साथीदारांसह अशा प्रकारे अनेकांना ब्लॅकमेल करीत असल्याची माहिती मिळाली. माझ्याप्रमाणे व्यवसाय करणारे राहुल यादव यांच्याकडे एक लाख, विनोद यादव यांच्याकडे दोन लाख आणि ओवेश सिद्दिकी यांच्याकडे एक लाख रुपयांची मागणी भूषण नाईक याने केल्याचे समजले.

२ यामुळे वालीव पोलिस ठाण्यात धाव घेऊन भूषण नाईक आणि त्याच्या तीन साथीदारांविरोधात साडेतीन लाखांची खंडणी घेतल्याची तक्रार बिहारी गुप्ता यांनी दिली आहे. या प्रकरणी वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. भूषण नाईक हे भाजपच्या वसई-विरार जिल्ह्याचे उपाध्यक्ष आहेत. या प्रकाराची आता राजकीय क्षेत्रात चर्चा सुरू आहे.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.नं.५.

# वसई-विरार शहर के फुटपाथ पर सजीं दुकानें राहगीर बीच सड़क पर चलने को हुए मजबूर

गोपाल गुप्ता | वसई

वसई-विरार शहर में सड़क किनारे फुटपाथ पर इन दिनों दुकानें सजी हैं। इससे यहां राहगीर जान जोखिम में डालकर सड़क पर चलने को मजबूर हैं। यह हाल यहां सभी इलाकों का है। इनमें नालासोपारा रेलवे स्टेशन जाने वाली सड़क, आचोले रोड, तुलिंज रोड सहित अन्य मुख्य सड़कों के फुटपाथ अतिक्रमण की भेंट चढ़ गए हैं। हर तरफ दुकानदारों और फेरीवालों के अतिक्रमण के बावजूद वसई-विरार महानगरपालिका के अधिकारी इसको लेकर मौन साधे हुए हैं।



मनपा की उदासीनता को लेकर उठे सवाल

**धनतेरस की पूर्व संध्या पर सड़कों पर हुआ ट्रैफिक जामः** धनतेरस की पूर्व संध्या पर शहर के बाजारों में बड़ी संख्या में लोग खरीदारी करने उमड़े थे। फुटपाथ पर सजीं दुकानों के कारण राहगीर सड़क पर चलने को मजबूर थे। इससे वाहनचालकों को ट्रैफिक जाम का सामना करना पड़ा। बता दें कि सड़क किनारे जहां फेरीवालों ने कब्जा जमा रखा है, वहीं दुकानदारों ने भी अपनी दुकानें फुटपाथ पर सजा रखी हैं। वहीं, खरीदारी करने आए ग्राहकों ने भी सड़क पर अपने वाहन पार्क कर ट्रैफिक जाम कर दिया। इससे सड़क की दोनों लेन पर वाहनों की कतार लग गई।

## एंबुलेंस को भी नहीं मिला रास्ता

नालासोपारा इलाके में लोगों को बाजार तक जाने में वाहनों की कतार के बीच पैदल चलने के लिए काफी मशक्कत करनी पड़ी। वहीं एंबुलेंस और स्कूली वाहन भी जाम में फंसे रहे।

## इन क्षेत्रों में ज्यादा अतिक्रमण

आचोले रोड, तुलिंज रोड, अंबाडी रोड, वालीव नवजीवन वाकन पाड़ा, वीरसावरकर मार्ग, साईनाथ नगर, आगाशी रोड, नालासोपारा पश्चिम स्टेशन रोड, एसटी रोड समेत अन्य सभी बाजारों का यही स्थिति रही।

## अस्थाई पार्किंग व्यवस्था भी नहीं दिला सकी राहत

वाहनों की पार्किंग के लिए बनाई गई अस्थाई पार्किंग भी लोगों को ट्रैफिक जाम से निजात नहीं दिला सकी। एपीआई विनोद जाधव ने बताया कि भीड़-भाड़ वाले इलाकों को चिह्नित किया गया है। दुकानदारों को अतिक्रमण के प्रति सचेत किया जा रहा है। वाहनों के लिए अस्थाई पार्किंग बनाई गई है। इसके इतर वाहन खड़ा करने पर कार्रवाई की जाएगी। इस मामले में मनपा के सहायक आयुक्त मोहन संखे से संपर्क करने को कोशिश की गई, लेकिन उन्होंने कोई उत्तर नहीं दिया।

Scanned with OKEN Scanner

Hindustan Times P-5

# Thane election officer rejects MVA's objection

Anamika Gharat

anamika.gharat@htlive.com

**THANE:** The Thane election officer on Wednesday rejected Maha Vikas Aghadi (MVA) candidate Rajan Vichare's objection to Mahayuti's Sanjay Kelkar's nomination papers, alleging the BJP candidate for the Thane city constituency concealed information about criminal charges in his affidavit.

Vichare had raised the objection during the scrutiny of the nomination papers on Wednesday. The hearing for this objection was held in the office of election officer Urmila Patil, who dismissed the objection without providing any reasons. Following this, Vichare's lawyer, Sushma Mishra, indicated that they would approach the high court against the election officer's decision to dismiss the objection without justification.

Vichare expressed his faith in the voters while speaking to the press. "If someone has criminal charges against him and conceals that information, the voters will, ultimately, make the right decision."

Kelkar had been booked in FIR no 186/2021 at Naupada PS under Section 188, Section 269 and Section 34 of the IPC.

# 161 INSPECTORS SHUNTED OUT OF THE CITY

Manish Kumar Pathak

manish.pathak@htlive.com

**MUMBAI:** A total of 161 police inspectors were transferred out of the city on Wednesday. The full list has names of 221 police inspectors from Mumbai, Navi Mumbai and Mira-Bhayander-Vasai Virar (MBVV) police commissionerates.

Seventy police inspectors were brought to the city from Akola, Sangli and Nashik, and from the Police Training Centre at Khandala.

Names of several senior inspectors, who were promoted as assistant commissioner only six months back, are also on the list, and so are the names of more than 20 senior inspectors posted at major police stations of the city, like Kandivali, Malwani, Kurla, Cuffe Parade, LT Marg and Vanrai.

Some senior officers have raised concern over the move's timing and its impact on the law and order, with the assembly elections duties going on.

Earlier, on October 4, 111 police officers from various stations had been transferred, as per directives from the Election Commission.

Scanned with OKEN Scanner

The Indian Express P-3, 6

# 221 police inspectors in Mumbai transferred out ahead of polls

**MOHAMED THAVER**
MUMBAI, OCTOBER 30

A WEEK after the Maharashtra DGP office sought names of officers who fit the criterion to be transferred before the Assembly elections, 221 officers from Mumbai, Navi Mumbai and Mira Bhayandar Vasai Virar (MBVV) police have been transferred.

Nearly 42 officers were moved to Mumbai police in place of the officers transferred.

Mumbai police had resisted the transfer on the ground that it would make it difficult to maintain law and order in the city with fewer officers.

The Election Commission, however, did not relent and after clarifying some conditions asked them to move out officers who had been in the same posting for more than three years.

The Indian Express had reported last week that large scale transfers were on the cards in Mumbai police.

The transfer list issued by the state police on Wednesday showed nearly 162 inspector rank officers from Mumbai city, nearly 38 inspectors from MBVV police, and nearly 21 officers from Navi Mumbai police were transferred out of their commissionerates.

Further, the state home department and DGP office are also in the process of appealing against the stay order on their transfer granted to 21 cops by the Maharashtra Administrative Tribunal (MAT).

The Mumbai police had on October 4 transferred 112 officers from whom 21 officers were granted stay.

The Mumbai police had carried out the transfers after EC pulled up Maharashtra government on "partial compliance" of its orders.

Further, the EC, earlier this month, in a letter clarified that irrespective of which district in Mumbai an officer was posted in, it will be counted in their service record in Mumbai police.

As per rules, anyone who has served in an executive post in three of the past four years in a district has to be transferred before elections so that they don't wield influence and tamper with the election process.

Based on the EC letter, the DGP on October 23 wrote to Mumbai, Navi Mumbai and Mira Bhayandar Vasai Virar (MBVV) seeking a list of officers who fit this criterion and sought the list by 6 pm.

# Among those to miss poll bus: 2 ex-police officers, IRS officer

**MOHAMED THAVER**
MUMBAI, OCTOBER 30

AMONG THE names which were expected to be in the list of candidates for the Maharashtra Assembly elections but did not make it are that of two former police officers and an IRS officer.

Former Mumbai Police Commissioner Sanjay Pandey, who joined Congress in September, IRS officer Sameer Wankhede, and retired ACP Vasant Dhoble were expected to be in the fray.

Meanwhile, wife of former police officer Pradeep Sharma, who had joined Shinde Sena, eventually filed nomination as an independent candidate.

Sources said that while Pandey was interested in contesting the Assembly polls from Versova, the seat was given to Congress's MVA ally Sena (UBT).

"He could not begrudge the party as they did not get the seat. And he did not want to leave the party that he just joined," a source said. About talks of him being given some other seat to contest, the source said, "He had worked in Versova and felt he had a chance there. It was pointless fighting from a seat where he had no base. He decided to bow out of the race."

Swikruti Sharma, wife of former police officer Pradeep Sharma, who was known as "encounter specialist", had joined the Shiv Sena led by Chief Minister Eknath Shinde and was expected to contest from Andheri East.

The seat was, however, given to Murji Patel, the BJP candidate who moved to Shinde Sena.

Sharma filed nomination as an independent from the seat which is currently held by Sena UBT MLA Rutuja Latke.

"We have done a lot of social work over the past one year including providing ambulances that conducted medical camps at six places every day," Sharma told *The Indian Express*.

Earlier there were rumours that Patel was asked to withdraw from the contest, but eventually he was chosen as the Shinde Sena candidate from the seat. Patel had previously contested against Latke in a by-election.

Sources said that BJP's reluctance to support Swikruti Sharma's candidacy also stems from her husband's controversial past, including his arrest by the National Investigation Agency (NIA) in connection with the Antilia bomb scare case.

A source said that Shinde Sena leaders are trying to convince Pradeep Sharma to take back the candidature of his wife.

They have time till November 4, the last date for withdrawal of nominations.

Around a week ago, there were speculations about Sameer Wankhede, a serving IRS officer, contesting polls from Shinde Sena from Dharavi. However, sources in the party denied any such move. Sources close to Wankhede claimed that while he did have feelers from some parties, he was reluctant to give up on his 16 years of service and decided to stay the course.

There also speculations about retired ACP Vasant Dhoble, known for his raids on bars, showing interest in contesting the polls. While banners declaring support for him in the elections had come up in Goregaon area, Dhoble's name also did not come up when the parties where choosing candidates.

Scanned with OKEN Scanner

The free press Journal - 9

# Duo arrested with charas worth ₹1.25cr

Suresh Golani

MIRA BHAYANDAR

The anti-narcotics cell (ANC) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have arrested two drug peddlers who were found to be in possession of charas (marijuana) worth more than Rs1.25 crore. A patrolling team from the ANC spotted two suspicious-looking men in the Golden Nest area of Bhayandar East on Tuesday afternoon.

The duo who apparently noticed the police jeep, tried to escape from the spot but were accosted after a hot chase by the ANC personnel. Upon frisking the duo, aged 53 and 45 years, were found to be in possession of more than three kilograms of charas.

The duo who are said to be natives of Madhya Pradesh had arrived in the city to deliver the contraband. Both were booked under the relevant sections of the Narcotic Drugs and Psychotropic Substances (NDPS) Act, 1985.

Scanned with OKEN Scanner